म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा.क्र. १२७९




# कांहींतरी नवेंच करा!

BVBK-0401249
BVBK-0401249

# मराठी मुद्रक

# मराठी मुद्रक

क्रु. के. राहाळकर

काहींतरी नवेंच करा : ४१

...कय शाखा.

BVBK-0401249

पन्नास नये पैसे

वोरा अँण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
मुंबई २.

©: १९५९
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

प्रकाशक:
अ. ल. गाडगीळ,
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लि. प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता,
मुंबई २.

आवृत्ति पहिली : १९५९
आवृत्ति दुसरी : १९६४

मूल्य ५० नये पैसे

मुद्रक:
अनंत जे. शाह
लिपिका प्रेस, कुर्ला रोड,
अंधेरी, मुंबई ५९.

आज मराठी भाषेंत शेकडों पुस्तकें प्रतिवर्षीं प्रकाशित होत आहेत. चालू मराठी साहित्यांतील कस किती वाढत आहे, तें राष्ट्रीयदृष्ट्या उपकारक आहे कीं अनुपकारक हा वादाचा मुद्दा म्हणून बाजूला ठेवला तर, मराठीचें मुद्रण सुधारतें आहे, प्रगत होतें आहे याबद्दल कोणीहि ग्वाही देईल. मराठींतील या मुद्रणाचा शास्त्रशुद्ध प्रारंभ एका अल्पशिक्षित माणसानें केलेला आहे, आपली सारी हयात त्यासाठीं त्यानें वेचलेली आहे, हें मात्र फारच थोड्यांना माहीत असतें. परंतु कृतज्ञता म्हणून तरी त्या व्यक्तीचें स्मरण करणें अवश्य आहे. ती व्यक्ति म्हणजे गणपत कृष्णाजी. आजच्या प्रगत मराठी मुद्रणाचें श्रेय या माणसाला द्यायला हवें आहे. गणपत कृष्णाजींची जन्मतिथि माहीत नाहीं; परंतु त्यांनीं इहलोकींची यात्रा संपविली त्याला पुढील म्हणजे १९६० या वर्षी बरोबर एक शतक पुरें होतें. त्या खऱ्याखुऱ्या 'मराठी मुद्रका'ला हा मानाचा मुजरा.

* * *

शाखा.
१२७८ दि. 20/५/७९
वा. वा.

# मराठी मुद्रक : गणपत कृष्णाजी

इ. स. १८२५ च्या सुमाराची गोष्ट. मुंबईतील एका छापखान्यांत एक कामगार छपाईचें काम करण्यांत गुंग होता. नेहमींच्या संवयीनें हात काम करीत होते, पण मनांत मात्र वेगळेच विचार घोळत होते ! त्या छापखान्याचें नांव होतें, 'अमेरिकन मिशन प्रेस'. आणि तो छापखाना, आपल्या नांवांप्रमाणें, ख्रिस्ती मिशनऱ्यांच्याच मालकीचा होता. या छापखान्यांतून ख्रिस्ती धर्माचा प्रचार व प्रसार होण्याच्या दृष्टीनें लहानमोठीं मराठी पुस्तकें छापून काढलीं जात व हिंदु जनतेंत त्यांचा प्रसार केला जाई. हीं पुस्तकें

स्वस्त किमतीचीं असत व प्रसंगीं तीं फुकटहि वांटलीं जात ! ख्रिस्ती धर्मग्रंथ बायबलाचें, 'शुभ वर्तमान' नांवाचें मराठी भाषांतर छापणें, "इंग्रजी भाषणाचें ज्ञान मिळविण्या-साठीं साह्यकारी" ठरणारीं पुस्तकें काढणें, वगैरे कामें या छापखान्यांतून चालतच; पण ऋग्वेदांतील पहिल्या मंडलाचें, मूळ संस्कृतासह मराठी व इंग्रजी भाषांतर दिलेलें "त्रिविद्या त्रिगुणात्मिका" सारखीं, हिंदूंना उपयुक्त वाटणारीं पुस्तकेंहि हा छापखाना छापी ! कांहीं, त्या वेळचीं उपयुक्त अशीं शालोपयोगी पुस्तकेंहि तेथें छापलीं जात.

## नवा विचार सुचला

हें सर्व पहात असतांना वरील कामगाराच्या मनांत वारंवार असा विचार येई कीं, "परदेशांतून आलेल्या या परधर्मी पाश्चात्त्यांप्रमाणें, आपल्यांतील कोणाला हिंदुधर्मप्रकरणीं व इतरहि पुस्तकें कां छापतां येऊं नयेत ?" "आपणच तसें करण्याचा प्रयत्न करावा," असा विचारहि त्याला सुचला व तो पुढें वाढीस लागला. या छापखाना-कामगाराचें नांव होतें 'गणपत कृष्णाजी.'

गणपत कृष्णाजी फारसे शिकलेले नव्हते. जेमतेम लिहिणें वाचणें, सही करतां येणें येथपर्यंतच त्यांच्या पुस्तकी ज्ञानाची प्रगति होती. लहानपणीं त्यांच्यावर विद्येचा

संस्कार झाला नाहीं. चरितार्थासाठीं त्यांना मजुरी, मेहनत करणेंच आवश्यक होतें. वर सांगितलेल्या 'अमेरिकन मिशन' छापखान्यांत दरमहा दोन रुपये पगारावर, टाईप (अक्षरांचे खिळे) घासून साफसूफ करण्याच्या कामावर ते लागले. या कामांत (छापखान्यांत) त्यांस गोडी वाटली व आपल्या कामाच्या चांगुलपणामुळें व व्यवस्थित कामामुळें त्यांनीं वाढतां वाढतां 'प्रेमसन' होण्यापर्यंत मजल गांठली. या छापखान्यांत शिळा छपाई ( लिथो ) व खिळा छपाई ( टाइप प्रिंटिंग ) अशा दोन्ही प्रकारचीं कामें होत.

स्वतःचा छापखाना उभारण्याची, कांहींशीं धाडशी पण तीव्र आकांक्षा मनांत ठेवून गणपत कृष्णाजीनीं छापखान्यांतील वेगवेगळ्या सर्व कामांची व कृतींची माहिती मिळविली. यंत्रांची रचना, त्यांचा वापर, शिळेवर लिहावयाची, तसेंच खिळे तयार करण्याची कृति, निरनिराळ्या रंगांच्या व तऱ्हेच्या शाया (शिळा प्रेससाठीं विशिष्ट प्रकारची शाई लागते) या साऱ्यांची माहिती त्यांनीं मिळविली. "महाराष्ट्रांतील मराठी भाषेचे पहिले महाराष्ट्रीय मुद्रक" किंवा "मराठी मुद्रक-महर्षि" म्हणून त्यांना जो मान दिला जात आहे, त्याची पूर्वतयारी त्यांनीं अशा प्रकारें केलेली दिसून येते. "हिंदुधर्मविषयक मराठी पुस्तकें काढण्यासाठीं छापखना काढावयाचा"

या उच्च आकांक्षेनें ते भारून गेले होते. ती आकांक्षा पूर्ण करून त्यांनीं स्वतःच्या गुणांनीं आणि धाडसी कर्तबगारीनें हा मान मिळविला आहे.

## केल्यानें होत आहे रे

"केल्यानें होत आहे रे, आधीं केलेंचि पाहिजे" ही समर्थ रामदासांची उक्ति गणपत कृष्णाजींनीं प्रत्यक्षांत आणून दाखविली. स्वतःचा छापखाना उभारण्याचा विचार कायम करून त्यांनीं ताबडतोब त्या दृष्टीनें पावलें टाकण्यास सुरुवात केली. मिशनरी छापखान्यांतील कृति पाहून त्यांनीं मोठ्या युक्तीनें छापखाना तयार करण्याचा उद्योग आरंभिला. आपल्या हातानें एक लांकडी यंत्र तयार करून त्यांत त्यांनीं यश मिळविलें. लहान लहान शिळांचे तुकडे जमवून त्यावर अक्षरें कशीं उठतात तेंहि त्यांनीं यशस्वीपणें करून पाहिलें. छापण्याचीं यंत्रें व इतर साहित्य परदेशाहून येई व तीं यंत्रें व साहित्य सहजासहजीं विकत मिळणेंहि त्या काळीं जड होतें. शिवाय आर्थिक दृष्टयाहि त्यांना तशीं यंत्रें किंवा साहित्य विकत घेणें परवडणारें नव्हतें. तेव्हां शिळा प्रेसला लागणारी शाई कशी बनवावी या प्रयोगासच ते प्रथम लागले. निरनिराळे यशस्वी प्रयोग करून त्यांनीं स्वतःच्या कल्पनेप्रमाणें दोनचार प्रकारच्या उत्कृष्ट शाया बनविल्या.

इ. स. १८३० पर्यंत एवढी तयारी झाल्यावर, त्यांनीं एक लोखंडी दाब प्रेस, मुंबईंतच बनवून घेतला, मोठमोठ्या शिळा खरेदी केल्या आणि इ. स. १८३१ सालीं त्यांनीं स्वतःचा स्वतंत्र छापखाना "गणपत कृष्णाजीचा छापखाना" या नांवानें चालू केला. 'गरज ही शोधाची जननी आहे' असें जें म्हटलें जातें तें गणपत कृष्णाजींनी खरें करून दाखविलें ?

## कार्याचा शुभारंभ

छापखाना सुरू होताच, त्यांनीं आपल्या उद्देशाला अनुसरून पहिलेंच काम केलें तें मोठें महत्त्वाचें होतें. हिंदु-धर्मीयांच्या दृष्टीनें फार उपयुक्त आणि आवश्यक ठरणारें असेंच तें काम होतें. यावेळपर्यंत मराठी भाषेंत छापील पंचांग निघत नव्हतें. सामान्य लोकांना त्याची गरज तर लागत असे. गणपत कृष्णाजी यांनीं स्वतः एक पंचांग लिहून तयार केलें व तें प्रथमच आपल्या छापखान्यांत छापून काढलें. त्यांत वर्षफल, वर्षभविष्य, अशा प्रकारची माहितीहि दिली होती. त्या वेळीं या पंचांगाची किंमत आठ आणे होती.

एका महाराष्ट्रीय हिंदूनें काढलेलें हें पंचांग लोकांनीं वर्षप्रतिपदेच्या दिवशीं गुढीबरोबर पूजेसाठीं व वर्षफल वाचण्यासाठीं वापरलें. हें पंचांग शास्त्रीय व धार्मिक दृष्टीनें

शुद्ध होतें आणि त्याची छपाईहि त्या वेळच्या मानानें फारच चांगली होती. या घटनेचें महत्त्व विशेष आहे. या आधीं सुमारें सोळा वर्षांपूर्वीं (इ. स. १८१४ मध्यें) एक गुजराथी पंचांग छापण्यांत आलें होतें, त्याची किंमत दोन रुपये होती. तें एका पारशी छापखानदारानें एका गुजराथी ज्योतिषाकडून करवून घेऊन छापलें होतें. यावरून गणपत कृष्णाजींच्या, स्वस्त धार्मिक पुस्तकें छापून काढण्याच्या उद्योगाचें महत्त्व कळून येईल. पुढें हा उपक्रम, गणपत कृष्णाजींचा छापखाना बंद पडेपर्यंत चालू होता. त्या पंचांगाची किंमतहि पुढें कमी ठेवण्यांत येत असे. या पंचांगाच्या द्वारें, हिंदुधर्मविषयक पुस्तकें छापून तीं स्वस्त किमतींत विकण्याच्या उद्देशाचा शुभारंभ, गणपत कृष्णाजींनीं केला असें म्हणावयास हरकत नाहीं.

**पहिले महाराष्ट्रीय मुद्रक**

मराठी मुद्रण व्यवसायाचा प्रारंभ करून, त्याला प्रतिष्ठा प्राप्त करून देणाऱ्या या थोर मुद्रकाच्या जन्मसना-विषयीं आणि ठिकाणाविषयीं निश्चित माहिती उपलब्ध नाहीं. ते जातीनें भंडारी होते. त्यांच्या जन्म सन १८०० च्या सुमारास कुलाबा जिल्ह्यांत झाला असावा असा समज आहे व तो खरा असावा असें वाटतें. आजहि कुलाबा जिल्ह्यांतील, विशेषेंकरून अलीबाग तालुक्यांतील

अनेक माळी, आगरी, भंडारी जमातींतील लोक मुंबईस मुद्रण-व्यवसायांत चमकत आहेत. बऱ्याच मराठी छापखान्यांत व इतरत्रहि, हे लोक कुशल कामगार ठरले आहेत. गणपत कृष्णाजी फारसे शिकलेले नसले तरी उद्योगी, हुशार, चतुर कलावंत, दृढनिश्चयी व दीर्घोद्योगी होते. हिंदुधर्मावर त्यांची दृढ श्रद्धा होती आणि स्वभाषेचा अभिमानहि त्यांच्या ठिकाणीं होता. मुद्रक म्हणून त्यांनीं पुढें केलेल्या कामगिरीवरून ही गोष्ट सहजमान्य होणारी अशी आहे. "हरएक राष्ट्राची ज्ञानाची गणती, त्या राष्ट्रांतील ग्रंथांचे सामग्रीवरून करतां येतें" असें लोकहितवादींनीं, आपल्या 'शतपत्रां'त एके ठिकाणीं म्हटलें आहे. असे हे ग्रंथ, मराठींत, मुद्रित स्वरूपांत, मोठ्या संख्येनें दिसण्यांत गणपत कृष्णाजींनीं राष्ट्राची फार मोठी सेवा बजावली आहे. महाराष्ट्रानें त्याबद्दल त्यांचे ऋणी असलें पाहिजे.

## महाराष्ट्राचा गटेनबर्ग

गणपत कृष्णाजींच्या जीवनांत एक गमतीचा योगायोग आढळून येतो. लांकडी प्रेस, शिळाछाप, यांपासून सुरुवात करून, पुढें लवकरच त्यांनीं सर्व बाबतींत आघाडीवर असणारा छापखाना निर्माण केला. जगांत मुद्रणकलेचा आरंभ होऊन तिचा विकास ज्या क्रमानें होत गेला,

त्याचाच लहानसा नमुना गणपत कृष्णाजींच्या मुद्रकजीवनांत दिसून येतो. त्या दृष्टीनें मुद्रणकलेचा शोध, तिची प्रगति व तिचें भारतांत आगमन या गोष्टींची थोडक्यांत माहिती करून घेणें इष्ट, मनोरंजक असेंच ठरेल. भारतांतील इ. स. १८०० पूर्वींचें बहुतेक महत्त्वाचें ग्रंथभांडार हस्तलिखित असे. संस्कृत व इतर देशभाषांत (मराठींतहि) पुस्तकें छापण्यास सुरुवात इ. स. १८०० नंतर झाली. मराठी मुद्रणापुरती ही महत्त्वाची कामगिरी गणपत कृष्णाजींचीच झाली आहे.

मुद्रणकलेंत आज कितीतरी सुधारणा आणि सोई झालेल्या आहेत. या कलेचा विकास करून तिला पूर्णावस्थेस आणण्याचें काम पाश्चात्त्यांनीं केलें असलें तरी छापण्याची कला चिनी लोकांना फार पूर्वीं माहिती होती असे पुरावे सांपडले आहेत. चीनमधील एक छापील जुनें पुस्तक १९०७ सालीं मध्य आशियांतील ‘शंभर बुद्धाच्या गुहें’त सांपडलें आहे. त्याचें नांव ‘हिरकसूत्र’ अथवा ‘वज्रसूत्र’ असें असून तें इ. स. ६८६ या वर्षीं छापलेलें आहे. तें छापील आहे, पण पुस्तक स्वरूपांत नसून, आपल्याकडे जन्मकुंडल्यांची (टिपणांची) जशीं लेखी कागदाचीं भेंडोळीं असतात, तसें तें आहे ! आणखीहि एक दोन पुस्तकें चिनी भाषेंत छापलेलीं सांपडलीं आहेत. त्यावरून चिनी लोकांना लाकडी कोरीव चित्रांच्या

ठशावरून अनेक प्रती छापण्याची माहिती होती असें दिसून येतें

पण मुद्रणकलेच्या खऱ्या वाढीस सुरुवात गटेनबर्ग यानें जर्मनींत इ. स. १४५० मध्यें केली. लांकडी ठशावरून, लांकडी यंत्राच्या साहाय्यानें शेंकडों प्रती छापण्याचा प्रयोग त्यानें यशस्वी करून दाखविला; म्हणून गटेनबर्गलाच "अर्वाचीन मुद्रणकलेचा जनक" म्हणतात. त्यानें इ. स. १४५६ मध्यें 'बायबल' छापून प्रसिद्ध केलें. छापखाना काढल्यावर त्यावर प्रथम बायबल छापणें हें त्याचें एक उद्दिष्ट व महत्त्वाकांक्षा होती आणि तें काम केल्यावर त्याला मोठें समाधान वाटलें. गणपत कृष्णाजींचा उद्देश व गटेनबर्गचा उद्देश यांतोल हें साम्य लक्षांत ठेवण्यासारखें आहे. या दृष्टीनें गणपत कृष्णाजी यांना 'महाराष्ट्राचा गटेनबर्ग' सार्थपणें म्हणतां येईल.

कोरलेले लाकडाचे ठोकळे, लांकडी टाइप (अक्षरें) नंतर तांबें, पितळ, या धातूंचे टाइप अशी प्रगति मुद्रणकलेंत होत चालली. पुढें पोलादी पंच तयार करून, त्यांत टाइप ओतून पाडण्याचा शोध लागला. या कलेंत हॉलंड या देशानें बरीच प्रगति केली. इंग्लंडमध्यें कॅक्स्टन यानें धातूचीं अक्षरें तयार करून इ. स. १४७७ मध्यें पहिलें इंग्रजी पुस्तक छापलें. जर्मनी, इंग्लंड, हॉलंड यांनीं

मुद्रणकला पूर्णावस्थेस आणण्याचें कार्य केलें. आज टाइपासाठीं शिसें, जस्त, अँटीमनी या धातूंच्या विशिष्ट प्रमाणांतील मिश्रणांची धातु वापरली जाते. गणपत कृष्णाजींच्या छापाखान्यांत सुरुवातीला (१८३१ ते १८४३) शिळा छापाचेंच काम होत होतें. १८४३ पासून त्यांनीं धातूचे टाइप ओतून खिळा छाप तयार करून खिळा छपाईस सुरुवात केली.

## भारतांत मुद्रणकलेचा प्रवेश

भारतांत मुद्रणकला आणण्याचा प्रयत्न पोर्तुगीज व डच मिशनऱ्यांनीं केला. पोर्तुगीजांनीं गोव्यांत आपलें बस्तान बसविल्यावर त्यांनीं ख्रिस्ती धर्माच्या प्रसारासाठीं मुद्रणयंत्रें भारतांत आणलीं. गोव्यांतील धर्मगुरूंनीं आरंभीं पोर्तुगीज व लॅटीन भाषेंत धार्मिक पुस्तकें छापलीं. पोर्तुगीज भाषेंतील धर्मप्रचार-पुस्तक १५५६ मध्यें गोव्यांत छापलें गेलें. हेंच भारतांतील पहिलें छापील पुस्तक होय. नंतर याच छापखान्यांतून इंग्रजीं पुस्तकेंहि निघालीं. गोव्याजवळील सासष्टी येथील छापखान्यांतून मराठी (कोंकणी) भाषेंतील पण रोमन लिपींत छापलेलें पुस्तक १६१६ सालीं निघालें. हें पुस्तक म्हणजे फादर स्टिफन्स यानें लिहिलेलें 'ख्रिस्त पुराण'. मद्रास इलाख्यांतहि डच मिशनऱ्यांनीं १७१२ सालीं एक छापखाना स्थापन केला.

तेथें त्यांनीं जर्मनींतून ओतून आणलेल्या तामीळ अक्षरांच्या टाइपांत पुस्तकें छापलीं. भारतांत खिळाक्षरें तयार होण्याचा पहिला मान तामीळ भाषेकडे जातो. गोव्यांत पोर्तुगीज (ख्रिस्ती) धर्मप्रचारकांनीं छापलेल्या पुस्तकांत 'छापखाना' या अर्थी 'लिहित मंडप' हा शब्दप्रयोग वापरलेला आढळतो.

## भारतीयांचें मुद्रणकलेकडे लक्ष

महाराष्ट्रांत धार्मिक पुस्तकें छापण्यासाठीं छापखाना काढण्याची कल्पना १८३० मध्यें गणपत कृष्णाजींच्या मनांत आलीं, तत्पूर्वीं इ. स. १६६२ च्या सुमारास तशीच कल्पना काठेवाडांतील कोणा भीमजी पारेख नांवाच्या भाटीया गृहस्थाच्या मनांत आली. त्या वेळच्या इंग्रज गव्हर्नरामार्फत त्यानें इंग्लंडमधून मुद्रक आणण्याचा प्रयत्न केला, त्याला नागरी व गुजराथी (बनिया) टाइप तयार करावयाचे होते. पण त्याचा तो प्रयत्न विशेष यशस्वी झाल्याचें दिसत नाहीं. त्याचा छापखाना अगदीं छोटया स्वरूपांत १६७४ सालीं निघाला, पण तो चालला नाहीं. तरी पण त्यानें बनिया लिपींतील टाइप पाडण्यांत यश मिळविलें. या लिपींतील अक्षरें मोडीसारखीं दिसणारीं आहेत. भीमजी पारेखच्या छापखान्यांत छापलेलीं, बनिया लिपींतील कांहीं धार्मिक पुस्तकें आज उपलब्ध आहेत.

## गणपत कृष्णाजीपूर्वीचें 'अर्ण यंत्र'

मराठी मुद्रणकलेच्या इतिहासांत मनोरंजक माहिती आढळते. शिवाजी महाराजांनीं एक छापखाना इंग्रजांकडून विकत घेतला होता, पण त्यांना तो चालविणें शक्य न झाल्यामुळें १६७४ सालीं भीमजी पारेख नांवाच्या गुजराथ्याला विकला अशी माहिती श्री. कन्हैयालाल मुनशी यांनीं आपल्या ग्रंथांत दिली आहे. पण या माहितीला महाराष्ट्राच्या इतिहासांत विश्वसनीय आधार सांपडत नाहीं. कदाचित् भीमजी पारेखला (वर उल्लेखिलेल्या) इंग्रजांकडून छापखाना मिळवून देण्यासाठीं महाराजांनीं प्रयत्न केले असावेत.

भोसले राजघराण्याशीं निगडीत अशी छापखान्याविषयीं आणखी माहिती उपलब्ध आहे. तंजावरच्या सरफोजीराव भोसले या मराठी राजानें १८०६ सालीं छापलेलें "एकशेंदहा इसापनीति कथा" हे पुस्तक मिळालें आहे. ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या साहाय्यानें त्यांनीं तंजावर येथें छापखाना काढल्याचें दिसतें. या छापखान्यांत छापलेले कांहीं संस्कृत ग्रंथहि आहेत. याच छापखान्यांत १८०९ सालीं एकनाथांच्या भावार्थरामायणाच्या युद्धकांडाच्या कांहीं प्रती छापल्या आहेत. या वेळीं छापखान्याला "अर्ण यंत्र" (अर्ण=अक्षर) हें दुसरें संस्कृत नांव प्राप्त झालें.

सर चार्ल्स विल्किन्स या मिशनऱ्यानें बंगालमध्यें देवनागरी टाइप तयार केले. दुसरा एक मिशनरी डॉ. वुइल्यम कॅरे यास शुभवर्तमान (बायबल) देशी भाषांत छापावयाचें होतें. त्यानें पंचानन नांवाच्या एका टाईप पाडण्याची कला अवगत असणाऱ्या लोहाराची मदत घेऊन बंगाली, नागरी, मराठी (मोडी) वगैरे लिप्यांचे टाईप तयार केले. त्याचा छापखाना बंगाल्यांत श्रीरामपूर येथें होता. हे टाइप तयार करतांना डॉ. कॅरे यांस, तेथें असलेले एक महाराष्ट्रीय विद्वान् पंडित वैजनाथ यांचीहि मदत झाली. या छापखान्यांत १८०५ सालीं मराठी व्याकरण छापून निघालें. नंतर १८१४ सालीं सिंहासन बत्तिशी व १८१५ मध्यें हितोपदेश वगैरे पुस्तकें छापण्यांत आलीं. या पुस्तकांतून व्याकरणास नागरी अक्षरें व इतर मराठी पुस्तकांस मराठी मोडी लिपी वापरली आहे.

### छपाईचे तीन प्रकार

छापण्याच्या एकंदर तीन पद्धति आहेत. (१) सुटचा अक्षर खिळयांनीं छापणें, याला 'खिळाछाप' ( Typography ) असें म्हणतात. (२) दगडावर विशिष्ट शाईनें अक्षरें उठवून त्यावरून छपाई करणें, याला 'शिळा छपाई' ( Lythography ) म्हणतात. या छपाईचा शोध १७९६ मधील आहे. गणपत कृष्णाजींचा छापखाना

आरंभीं याच प्रकारचा होता. टाइपाची गरज नसल्यामुळें ही छपाईची पद्धत सुलभ, सोपी होती व त्यावर अक्षरांप्रमाणेंच चित्रेंहि छापतां येतात (आजहि मोठमोटीं प्रसिद्धी पत्रकें, नकाशे याच पद्धतीनें छापतात.) म्हणून सुरुवातीला ही पद्धत फार लोकप्रिय ठरली. (३) लांकडाच्या किंवा धातूच्या ठोकळ्यांवर अक्षरें कोरून काढून, त्यावरून छपाई करणें, याला 'ठोकळा छाप' (Xylography) म्हणतात. या पद्धतीनें गीताग्रंथ छापण्याचा उपक्रम, पेशवाईंतील धुरंधर मुत्सद्दी नाना फडणवीस यांनीं केला होता; तो १८०५ मध्यें, मिरज संस्थानचे तेव्हांचे अधिपति सर गंगाधरराव पटवर्धन यांनीं पुरा केला. ही गीता ज्यावरून छापली ते कोरीव ठोकळे मिरजच्या पटवर्धन घराण्याकडे आहेत.

**मुंबईंतील छापखाने**

इ. स. १६६१ मध्यें मुंबई बेट पोर्तुगिजांकडून इंग्रजांकडे आलें. मुंबईंतहि मिशनऱ्यांच्याच प्रयत्नानें १६७५ पासून छापखाने निघूं लागले. पहिलें इंग्रजी भाषेंतील पुस्तक मुंबईंतच १७९३ सालीं छापलें गेलें. गणपत कृष्णाजी, ज्या छापखान्यांत नोकरीला होते, तो "अमेरिकन मिशन प्रेस" मुंबईंत सन १८१३ मध्यें स्थापन झाला. ख्रिस्ती धर्मप्रसारासाठीं इंग्रजी, मराठी, गुजराथी

पुस्तकें छापून प्रसिद्ध करण्याचा उद्देश, हा छापखाना काढण्यामागें होता. त्यांतून निघालेल्या पुस्तकांबद्दल वर उल्लेख आलाच आहे. पहिलें मराठी छापलेलें पुस्तक "पंचोपाख्यान" हें इ. स. १८२२ सालीं निघालें. १८२४ मध्यें मुंबई सरकारचा शिळा छापखाना निघाला व १८३१ सालींच सरकारी छापखाना (आजचा गव्हर्नमेंट सेन्ट्रल प्रेस) सुरू झाला. एव्हांना इतरहि छापखाने निघाले होते व कांहींतून वृत्तपत्रेंहि निघूं लागलीं होतीं.

## गणपत कृष्णाजींचा छापखाना

गणपत कृष्णाजींच्या छापखान्याची सुरवात पंचांग-छपाईनें झाली असें वर म्हटलें आहे. आज वर्षप्रतिपदेच्या दिवशीं पंचांगांची पूजा गुढी बरोबर करण्याचा प्रघात आहे. मग त्या वेळीं गणपत कृष्णाजींच्या पंचांगाची पूजा झाली. ब्राह्मणांनीं त्यांचा उपयोग वर्षफल सांगण्यासाठीं केला. यांत विशेष काय घडलें, असें वाटण्याचा संभव आहे. पण त्यांत खरोखरच विशेष आहे. मुद्रित (छापील) पुस्तकांना कर्मठ सनातन्यांचा, विशेषतः ब्राह्मणांचा विरोध होता ! मिशनऱ्यांनीं मुद्रणकलेचा उपयोग ख्रिस्ती धर्म-प्रसारासाठीं केला, या घटनेमुळें, मुद्रणकलेकडे कर्मठ सनातनी साशंकतेनें पाहूं लागले होते ! नैष्ठिक ब्राह्मण, छापील कागदांना स्पर्श देखील करीत नसत, छापील ग्रंथ

वाचीत नसत. शाईमध्यें चरबीसारखे कांहीं निषिद्ध पदार्थ असतात त्यामुळें ते ग्रंथ स्पर्शास अयोग्य असें ते मनीत. कांहीं सुशिक्षित समंजस विद्वान् मंडळीहि या मताची होती ! त्या काळचे एक विद्वद्वर्य व नियमितपणाविषयीं प्रसिद्ध असणारे रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक, (जे पुढें १८६५ ते १८७२ या कालांत गणपत कृष्णाजींच्या छापखान्याचे विश्वस्त होते) आंघोळ केल्यानंतर छापील ग्रंथाला शिवत नसत ! त्यांनीं सोवळ्यांत असतांना वाचण्यासाठीं हस्तलिखित पोथ्यांचाच उपयोग करण्याचें व्रत चालविलें होतें. ही परिस्थिति बदलण्याचें कार्य गणपत कृष्णाजींनीं केलें. गणपत कृष्णाजी या हिंदुधर्माभिमानी गृहस्थाच्या छापखान्यांत छापलीं गेलेलीं पुस्तकें हिंदु लोक आवडीनें वाचूं व विकत घेऊं लागले. रावसाहेब वि. ना. मंडलीक यांनीं मराठी संत कवि श्री तुकाराम महाराज यांची गाथा संपादून प्रसिद्ध केली होती. ती गणपत कृष्णाजींच्याच छापखान्यांत छापली होती. पंढरपूरच्या विठोबाचे भक्त असणाऱ्या वारकऱ्यांना ती अत्यंत प्रिय होती. पण मंडलिकांना कांहीं वारकरी पुढाऱ्यांनीं आरंभीं असें सुचविलें होतें कीं, ती गाथा ज्या शाईंत छापली आहे, त्या शाईंत कांहीं अपवित्र आणि त्याज्य वस्तु (चरबीसारख्या) मुळींच वापरलेल्या नाहींत अशी खात्री करून दिल्याशिवाय वारकरी भक्तमंडळी ती गाथा

विकत घेणार नाहींत ! गणपत कृष्णाजींचे छापखान्यांत ती छापली आहे, ते गृहस्थ धर्माभिमानी आहेत, हें कळल्यावर अर्थातच लोकांनीं निशंकपणें तिचा वापर करण्यास सुरवात केली, हें नमूद करण्यासारखें आहे. गणपत कृष्णाजींचें हें सुयश विशेष उठावदारपणानें दिसणारे आहें. छापखान्याची तयारी करण्यापूर्वी त्यांनीं दोन-चार प्रकारच्या शाया तयार करण्याचे प्रयोग केले होते, या उल्लेखाचें महत्त्व यावरून लक्षांत येईल.

## मुद्रित पुस्तकांविषयींच्या समजुती

पाश्चात्त्य संस्कृतीची कांहीं बाबतींत स्तुति व स्वीकार करणारे कांहीं मराठी विद्वान् पंडितहि छापील ग्रंथांना विरोध करणारे होते ही गोष्ट आज आश्चर्यकारक वाटणारी आहे, पण ती एक सत्यकथा आहे. दोऱ्याची शिवण, कापडी बांधणी, शाईंतील चरबी या गोष्टी लोकांना सोवळ्यांत स्वोकारणीय वाटत नव्हत्या. त्यावेळची ठाणें येथील 'अरुणोदय' पत्राच्या, दि. १४ ऑक्टोबर १८६६ च्या अंकांतील एक जाहिरात, या बाबतींत मनोरंजक वाटण्यासारखी आहे.

श्री गुरु चरित्र
सोवळ्यानें वाचण्याकरतां

हे पुस्तक चांगलें शुद्ध करून शिळाप्रेसवर छापण्याचें काम सुरूं आहे. कागद जाडा, अक्षर सुवाच्य, अक्टोबर १८६६ अखेर पैसा पाठविणारास किमत ४~४ व बंगीखर्च ~१२ एकूण पांच रुपयास मिळेल. २० प्रती घेणारांस बंगीखर्च पडणार नाहीं. किमतीबद्दल वर्तवळ्यासुद्धां तिकिटें पुण्याच्या ज्ञानप्रकाशचे म्यानेजर नांवें पाठवावीं म्हणजे पुस्तक तयार होतांच रवाना केलें जाईल.

(सही) रामचंद्र गणेश काळे.

ही जाहिरात १८६६ मधील म्हणजे गणपत कृष्णाजींच्या छापखान्याच्या स्थापनेनंतर ३५ वर्षांनीं आलेली आहे. अशाच प्रकारची जाहिरात—"तुपाच्या शाईंत ग्रंथ छापले आहेत" अशी जावजी दादाजींनाहि करावी लागली होती ! मग गणपत कृष्णाजींच्या काळीं (१८३१ ते १८६०) मुद्रित पुस्तकांविषयीं काय काय गैरसमज असतील याची कल्पनाच केलेली बरी ! सुप्रसिद्ध मराठी व्याकरणकार कै. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांना पाणिनीच्या 'अष्टाध्यायी'ची सार्थ मराठी आवृत्ति

काढावयाची होती. पण प्रा. बाळ गंगाधरशास्त्री यांचें म्हणणें पडलें कीं, अशा छापण्यानें सूत्रांचें पावित्र्य नष्ट होईल व त्यामुळें कदाचित् लोकक्षोभ होईल ! त्यामुळें दादोबांनीं आपला बेत कांहीं काळ स्थगित ठेवला ! थोरा-मोठ्यांची ही अवस्था, मग इतर कर्मठ अशिक्षितांच्या काय समजुती असतील ?

## त्यांच्या छापखान्याचें कार्य

या साऱ्या जुनाट व गैर समजुतींना तोंड देऊन गणपत कृष्णाजींना छापखान्याचें काम करावयाचें होतें, व आपले ध्येय साध्य करावयाचें होतें, व तें त्यांनीं केलेंहि. त्यांनीं कांहीं हिंदूंचीं धार्मिक पुस्तकें पोथीच्या आकारांत छापलीं, त्यामुळें तीं, रेशमी बासनांत गुंडाळून, पूजेसाठीं वापरण्यास मान्यता पावलीं. धार्मिक ग्रंथाबरोबरच त्यांनीं शालोपयोगी व इतर उपयुक्त लहान मोठीं पुस्तकें स्वस्त किंमतींत देण्याचें महत्कार्य केलें. त्यांचें छपाई काम, त्या वेळच्या मानानें सुबक, स्वच्छ, असें ठरलें गेलें होतें. त्यांनीं स्वतः छापलेलीं कांहीं पुस्तकें डॉ. विलसन, पाद्री गॅरेट, पाद्री अलब या मिशनऱ्यांना दाखविलीं. तीं त्यांस फार पसंत पडून, गणपत कृष्णाजींच्या उद्योगास उत्तेजन द्यावें म्हणून, त्यांनीं आपलें कांहीं छापखान्याचें काम गणपत कृष्णाजींकडे द्यावयास सुरुवात केली. कामाचा व्याप व पसारा वाढत चालला.

गणपत कृष्णाजींनीं छापून प्रसिद्ध केलेल्या शेकडों पुस्तकांपैकीं पुढील कांहीं महत्त्वाच्या पुस्तकांचा उल्लेख उपयुक्त ठरेल.

(१) दादोबा पांडुरंग यांचें मराठी भाषेचें व्याकरण ("दादोबांचें मोठें व्याकरण" म्हणून प्रसिद्ध असलेला मराठी व्याकरण ग्रंथ) पहिली आवृत्ति १८३६ ची व पुढील आवृत्त्या.

(२) इंग्लंडचा वृत्तांत: लेखक–हरी केशवजी; १८३८

(३) निघंटु प्रकाश–( प्रसिद्धवैद्यक ग्रंथ ) लेखक बापू गंगाधर जोशी; १८३९.

(४) ज्योतिषसार–( ज्योतिषविषयक ग्रंथ ) लेखक जनार्दन भास्कर भट, १८४८.

(५) हिंदुधर्मतत्त्व–(हिंदुधर्माच्या महतीविषयक ग्रंथ) लेखक–गंगाधरशास्त्री फडके; १८५२.

(६) देशव्यवहार शास्त्रांचीं मूलतत्त्वें–(एका उत्कृष्ट इंग्रजी पुस्तकाचें मराठी भाषांतर,) लेखक–हरी केशवजी, वि. ना. मंडलिक व इतर १८५४.

(७) भावचंद्रिका-श्रीकृष्णार्जुन संवाद ( गीताविषयक पुस्तक) लेखक–बाळाजी सुंदरजी आणि मुंडले. १८३९.

(८) वर उल्लेख केलेली, तुकाराम महाराजांच्या अभंगाची गाथा.

याशिवाय ज्यू लोकांचीं कांहीं धर्मविषयक पुस्तकेंहि १८५६ च्या सुमारास या छापखान्यांत छापलेलीं आहेत. अशीं अनेक पुस्तकें गणपत कृष्णाजींनीं छापून काढलीं व नांवलौकिक मिळविला.

## नियतकालिकांची व वृत्तपत्रांची छपाई

विविध ग्रंथप्रकाशनांबरोबर नियतकालिकें व वृत्तपत्रें यांच्या छपाईंतहि गणपत कृष्णाजींनीं विक्रम प्रस्थापित केला आहे. संपूर्ण मराठी भाषेंत प्रसिद्ध होणारें, 'प्रभाकर' हें पहिलें साप्ताहिक १८४१ सालीं निघालें, तें सुरुवातीला त्यांच्याच छापखान्यांत छापलें जात असे. मराठींतील त्या वेळचें श्रेष्ठ व उत्कृष्ट मासिक 'ज्ञानप्रसारक' १८५० मध्यें निघून १५।१६ वर्षें चाललें, तें आरंभापासून अखेरपर्यंत या छापखान्यांतून निघे. मराठींतील पहिलें त्रैमासिक 'ज्ञान दर्शन' (१८५४) व स्त्रियांच्या प्रश्नांचा विचार करणारें 'सुमित्र' मासिक (१८५५) हीं याच छापखान्यांतून छापलीं जात. 'दिग्दर्शन' सारख्या श्रेष्ठ मासिकाच्या छपाईची जागा हीच होती. गणपत कृष्णाजींच्या छापखान्यांत छापल्या जाणाऱ्या मासिकांची संख्या त्यांच्या म्हणजे १८५० पर्यंतच्या कारकीर्दींतच आठ-दहा तरी होतीं. थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं, मराठी भाषेच्या उन्नतीला गणपत कृष्णाजी व त्यांचा छापखाना यांचा खूपच हातभार लागला आहे.

## खिळाछपाईची सुरुवात

कामाचा व्याप वाढत चालला, इतर छापखानेहि निघू लागले, "असमाधानांतून विकास व्हावयाचा असतो" या न्यायानें त्यांनीं आपल्या छापखान्यांत मराठी टाइप (खिळाक्षरें) पाडण्यास सुरुवात केली. त्या काळच्या इतर छापखान्यांतील मराठी टाइपाच्या मानानें यांचे टाइप सुबक ठरणारे होते. त्यांनीं त्या वेळच्या टाइपांच्या घरांच्या (केसेसच्या) रचनेप्रमाणें, संपूर्ण आवश्यक ती अक्षर संख्या (फाँटस्) बनविली. निरनिराळ्या मापांचे, जातींचे, वळणांचे, निरनिराळ्या मुद्रांचे (फेसेस) टाईप त्यांनीं तयार केले. १८४३ पासून त्यांनीं खिळा छपाईस सुरवात केली. तेव्हांपासून गणपत कृष्णाजींचा छापखाना, 'शिळाछाप' व 'खिळाछाप' अशा दोन्ही प्रकारच्या छपाईचीं कामें करूं लागला. त्यांनीं गुजराथी टाइपहि तयार केला. इंग्रजी, मराठी, गुजराथी, संस्कृत, हिंदी (नागरी) अशा प्रकारची छपाई त्यांत होई. गणपत कृष्णाजी स्वतः कुशल कारागीर होते. चित्रें, नकाशे, कोरीव कांतीव काम, व वेलबुट्टी वगैरे काढण्याचें काम ते स्वतः करून त्यावरून ठसे बनवीत. १८३१ पासून त्यांनीं लहानमोठीं शेंकडों पुस्तकें, शिळा छपाईंत व टाइपांच्या छपाईंत छापून प्रसिद्ध केलीं. त्यावेळीं त्यांच्या छापखान्यांत छापल्या जाणाऱ्या मासिकांवर, त्यांच्या

छापखान्याचा पत्ता (ठिकाण) "बोरीबंदरचे लैनीनजीक, गांवांत जुनी जांबळी मशिदीची आळी" असा दिलेला आढळतो. डोंगरीवर गणपत कृष्णाजींचा छापखाना असल्याचाहि उल्लेख आहे.

त्यांचा उद्योगीपणा अवर्णनीय होता. अक्षरांचे खिळे तयार करण्याचें कसब साध्य करण्याचा उद्योग त्यांनीं स्वतःच केला. टाइपांचे पंच (साचे) तयार करून, त्यांत टाइप ओतून काढण्याचा कारखाना (टाइप फौंड्री) त्यांनीं स्वतःच काढला. सुप्रसिद्ध 'विविध ज्ञानविस्तारा' सारखीं मासिकें टाइपाच्या छपाईंत असत. वर उल्लेख केलेलीं मासिकें शिळा छपाईंत असत. मराठी मुद्रक-व्यवसायाला स्थिरता व उर्जितावस्था आणणारे व थोर प्रतिष्ठा प्राप्त करून देणार हे थोर कलावंत १८६० सालीं स्वर्गवासी झाले. यावेळीं मुंबईंत प्रसिद्ध व नमुनेदार छापखाने म्हणून मान्यता पावलेले असे तीन छापखाने होते. एज्युकेशन सोसायटीचा प्रेस, एक्स्चेंच प्रेस आणि गणपत कृष्णजींचा प्रेस हे तीन छापखाने होत.

## गणपत कृष्णाजींची कार्यपद्धति

गणपत कृष्णाजींच्या वेळीं छापखान्याचें साहित्य भारतांत भरपूर प्रमाणांत मिळण्याची शक्यता नव्हती. भांडवल बेताचेंच होतें, पण ते स्वतः कल्पक व दीर्घोद्योगी

असल्यामुळें त्यांना या परिस्थितीची अडचण भासली नाहीं. जावजी दादाजींना टॉमस ग्रॅहम, जीवन वल्लभ लोहार, रावजी राणू मारू असे कारागीर लाभूं शकले. पण गणपत कृष्णाजींना असे कोणी मिळाले नव्हते. त्यांनीं आपल्या कल्पनेप्रमाणें, सामान्य कारागिरांकडून कामें करून घेतलीं व त्यांत ते यशस्वी झाले.

गणपत कृष्णाजींना सरकारी सहानुभूति विशेष मिळत नव्हती. कारण सरकारी छापखाना याच सुमारास सुरू झाला होता. गणपत कृष्णाजींचा हिंदु धर्म विषयक पुस्तकें छापण्याचा उद्योग एक प्रकारें ख्रिस्ती मिशनऱ्यांना आव्हानच होतें. सरकारचा ओढा साहजिकच मिशनऱ्यांकडे असल्यामुळें आरंभीं तरी सरकारी काम, मिशन व इतर प्रेसकडे जात असे. रावसाहेब मंडलिकांसारख्यांची पुस्तकेंहि गणपत कृष्णाजींच्या छापखान्यांत छापलेलीं नाहींत.

## गणपत कृष्णाजींची सहिष्णु वृत्ति

आडचणींना तोंड देत, त्यांचें निवारण करीत, गणपत कृष्णाजींचा व्यवसाय चालला होता. छापखान्याचे उत्पन्न फार मोठें असें नव्हतेंच ! जो पैसा मिळेल तो छापखान्याच्याच वाढीसाठीं घालण्यांत येई. असें असून सुद्धां छापखान्याच्या धंद्याची वाढ हेंच ध्येय त्यांच्यापुढें होतें.

"प्रभाकर" पत्र सुरुवातीला यांच्या छापखान्यांत निघालें. नंतर चालक मंडळींनीं स्वतःचा छापखाना उभारण्याचें ठरविलें. आपलें काम जाणार यांची जाणीव असतांहि, त्यांनीं त्याला विरोध केला नाहीं. त्या छापखान्याच्या उभारणींतहि त्यांनीं शक्य ती मदत दिली. गणपत कृष्णाजींच्या छापखान्याजवळच हा छापखाना होता.

अडलेल्या परधर्मीयांनाहि त्यांची मदत मिळाली आहे. ज्यू लोकांचीं कांहीं धर्मविषयक मराठी पुस्तकें छापावयाचीं होतीं. त्यांची गरज गणपत कृष्णाजींनीं भागविली. ख्रिस्ती मिशनरी त्यांचीं पुस्तकें सवलतीनें छापून देत ना ! गणपत कृष्णाजींनीं ज्यू लोकांचीं दोन धर्मविषयक पुस्तकें (१) गरीब लोकांना धर्म करण्याविषयीं बोध (१८५६) (२) प्रायश्चित्ताच्या दिवशीं पापाविषयीं कबुली देणें, (प्रार्थनांचा मराठी सारांश) छापून देऊन त्यांची गरज भागविली. ज्यू लोकांचा उद्देश, हिंदु धर्मावर आक्रमण करण्याचा कधींच नव्हता. साहजिकच त्यांना योग्य ती मदत गणपत कृष्णाजींकडून झाली यांत आश्चर्य नाहीं.

व्याकरणविषयक पुस्तकें शुद्ध स्वरूपांत छापणें अवश्य असतें. गणपत कृष्णाजींच्या छापखान्यांत तें काम छान होई. दादोबा पांडुरंगांखेरीज, इतर मराठी व्याकरणाची पुस्तकेहि (उ. गंगाधरशास्त्री फडके यांचींहि व इतर) त्यांच्याच छापखान्यांतून छापून निघालेलीं आहेत.

## त्यांचा विशिष्ट दृष्टिकोन

छापखान्याची वाढ, त्याची सुधारणा आणि मराठी मुद्रणकलेची प्रगति हेंच मुख्य ध्येय त्यांच्यापुढें होतें; आणि त्यांतच त्यांचें लक्ष होतें. हिंदु धार्मिक पुस्तकांसाठीं चरबीविरहित शाईचें संशोधन त्यांनीं केलें. सरकारी मदत मिळविण्याचा विचार त्यांच्या मनांत कधींच आला नाहीं. कोणालाहि येणारी मुद्रणविषयक अडचण दूर करणें हें त्यांचें व्रत होतें. आणि म्हणूनच अनेक मराठी नियतकालिकांना त्यांनीं साहाय्य केलें. द्रव्य मिळविण्याची दृष्टि नसल्यामुळेंच हें तें करूं शकले. त्यांच्या छापखान्यांत असलेला नोकरवर्ग, त्याच वृत्तीचा असल्यामुळें, ते हें कार्य विशेष उत्साहानें व यशस्वीपणें करूं शकले. त्यांच्या छापखान्यांतून प्रसिद्ध झालेल्या शेंकडों पुस्तकांवरून ही गोष्ट स्पष्ट दिसून येईल. केवळ मनोरंजक व शालेय साहित्य प्रकाशित करून पैसे मिळविण्याचा हव्यास त्यांनीं धरला नाहीं. आवश्यक आणि उपयुक्त असणाऱ्या मराठी ग्रंथाचें प्रकाशन त्यांनीं केलें आहे. आणि यांतच त्यांचे वैशिष्ट्य आहे. उच्च वाङ्मय त्या कालांत मोठ्या प्रमाणांत खपण्यासारखें नव्हतें, पण तें प्रसिद्ध करून त्यांनीं मुद्रणकलेबरोबरच प्रकाशन कार्यांतहि एक आदर्श निर्माण करून ठेविला.

## छापखान्याचा अस्त

गणपत कृष्णाजींच्या मृत्यूनंतर त्यांचे चिरंजीव कान्होबा गणपत यांनीं १८६५ सालापर्यंत, वडिलांच्या कीर्तीला साजेसा छापखाना चालविला. त्यांच्या मृत्यूनंतर, त्यांचे चिरंजीव आत्माराम कान्होबा (गणपत कृष्णाजींचे नातू) अल्पवयी असल्यामुळें, छापखान्याची देखरेख करण्यासाठीं रावसाहेब वि. ना. मंडलिक व गंगाधर शास्त्री गोविंद फडके या दोघांना विश्वस्त नेमण्यांत आलें. १८७२ पासून आत्माराम कान्होबा छापखान्याचें काम पाहूं लागले. आपल्या आजोबांचा लौकिक व परंपरा कायम राखून, त्यांनींहि अनेक उत्कृष्ट ग्रंथ प्रसिद्ध केले. १८८० सालांत ते वारल्यावर कोणीं नाडकर्णी यांच्याकडे या छापखान्याची व्यवस्था गेली. तेहि १९०० सालीं वारल्यानंतर छापखान्यास उतरती कळा लागली. १९१४ सालीं, कांहीं आक्षेपार्ह मजकुराचीं चोपडीं व पत्रकें छापल्याच्या निमित्तावरून ब्रिटिश सरकारची वक्रदृष्टि या छापखान्याकडे वळली व शेवटीं सरकारनें हा छापखाना जप्त करून त्याचा लिलाव केला. महाराष्ट्रांतील एका नामवंत व आदर्शभूत ठरणाऱ्या छापखान्यास, अशा दुर्दैवी परिस्थितींत, अखेर नामशेष व्हावें लागलें !

गणपत कृष्णाजींचा छापखाना नाहीसा झाला असला तरी त्यांनीं आपल्या छापखान्याच्या द्वारें केलेली

महाराष्ट्राची, मराठी भाषेची, हिंदु धर्माची व त्याबरोबरच जनतेची सेवा चिरकाल टिकेल.

मुद्रकाचा व्यवसाय करतांना गणपत कृष्णाजींनीं द्रव्योपार्जन मुख्य मानलें नाहीं; आपल्या हातून कांहींतरी विशेष व चांगलें कार्य घडावें. असाच प्रयत्न त्यांनीं आयुष्यभर केला. पेशवाई नुकतीच नष्ट झालेली होती, इंग्रज राजवटीचाहि जम जेमतेम बसूं लागला होता नव्हता. महाराष्ट्रांतलें एकंदर वातावरण कांहींसें अस्थिरच होतें. अशा अवस्थेंत एका अल्पशिक्षित माणसानें इकडे नवीनच सुरू झालेल्या मुद्रण व्यवसायांत पडण्याचें धाडस करावें व त्यांत यशस्वी होऊन, मुद्रण-व्यवसाय महाराष्ट्रांत नमुनेदार व स्थिर होण्यास कारणीभूत व्हावें यांतच त्यांची थोरवी प्रकट होते. महाराष्ट्रांत आज मुद्रण-व्यवसाय खूपच वाढला आहे व खूपच सुधारलेला आहे. त्याचें श्रेय गणपत कृष्णाजींनाच द्यावें लागेल. आणि या दृष्टीनें गणपत कृष्णाजींच्या या छोटयाशा चरित्राचें 'मराठी-मुद्रक' हेंच नांव अन्वर्थक वाटतें.

★

BVBK-0401249

## 'उत्कट भव्य तेंचि घ्यावें'

...असे संस्कार
नव्या पिढीच्या मनावर व्हावेत;
कुमारवयाच्या मुलांमुलींना
ज्ञान आणि स्फूर्ति प्राप्त व्हावी;
या हेतूनें चालू केलेली—

कुमार साहित्य माला

हद्दपार : एका शिक्षकाचें ध्येयजीवन कादंबरी (संक्षिप्त); श्री. ना. पेंडसे १·५०
हेन्री फोर्ड : मोटार-कारखानदाराचें चरित्र अनु. अमरेन्द्र २·००
ओंजळ : संस्कारी कथासंग्रह; वामन चोरघडे १·७५
कोनटिकी : तराफ्यावरील साहसी सागरी सफर; अनु. श्रीकान्तराय २·००
राखेंतील निखारे : १८५७ वरील कादंबरी; अनु. सौ. मृणालिनी देसाई १·७५
उत्तरेकडील भिंती : चिंतनपर निबंध; काका कालेलकर १·२५
ॲब्राहम लिंकन : (दु. आ.) चरित्र एमिल लुड्विग;
अनु. गोपाळराव कुलकर्णी १·५०
माशाचे अश्रु : नवनीति-कथा; बाळ गाडगीळ १·५०
अंधारवड : रहस्यमय कादंबरी; साहित्यसम्राट् कै. न. चिं केळकर २·००
पहिली अखंड भरारी : (दु. आ.) क. लिंडबर्गचें विमानोड्डाण
चार्ल्स लिंडबर्ग; अनु. शं. ल. चिटणीस १·५०
विश्वाच्या कळसावर : राधानाथवरील (एव्हरेस्ट) मोहिमा;
श्रीकान्तराय २·००
शिल्पकार : (दु. आ.) शिक्षकांची व्यक्ति-रेखाचित्रें; श्रीकान्तराय १·२५
प्रवाळाच्या बेटांवर : निसर्गसान्निध्यांत तीन मुलें; अनु. सुशील परभृत २·००
वाघजईच्या जंगलांत : राजारामकालीन ऐति. कादंबरी;
रूपांतर—सुशील परभृत २·००
राइट बंधु : पहिल्या विमान-निर्मात्यांचें चरित्र; अनु. अमरेन्द्र २·००
घर-दार : घरचीं नि गांवचीं शब्दचित्रें; व्यंकटेश माडगूळकर २·००
चिरंजीव त्यांचें जगीं नाम राहे : वीर बाल-बालिका-कथा;
द. म. उतेकर १·५०
सुभाषित-कथा : १ : (दुसरी आ.) संस्कृत सुभाषितांच्या पार्श्व-
कथा : प्रा. नी. शं. नवरे १·५०

अस्मत : साहसी सागरी शिकार-कथा; माधव कानिटकर १·२५
छोटा सरदार : एका मुलाचा पराक्रम ऐतिहासिक कादंबरी; गो. वि. नामजोशी २·००
दक्षिण ध्रुवाचीं क्षितिजें : दक्षिण ध्रुवावरील मोहिमा; श्रीकान्तराय २·००
सूडाची आग : 'Withering Heights' अनुवादक; द. के. बर्वे २·००
कथांजली : रवींद्रनाथ टागोरांच्या निवडक कथा; ना. गो. शुक्ल १·७५
सुभाषित कथा : २ : (दु. आ.) संस्कृत सुभाषितांच्या पार्श्वकथा; प्रा. नी. शं. नवरे १·५०
दया तिचें नांव : टॉलस्टॉयच्या निवडक कथा; ना. गो. शुक्ल १·७५
पृथ्वी ते सप्तर्षिमंडळ : भारतीय विज्ञान-काल्पनिका; डॉ. संपूर्णानंद, अनु. शि. शं. आपटे १·५०
वनांतील वाट : निसर्गविषयक व इतर कथा; शांताराम आठवले १·७५
प्रेरणा : मुन्शी प्रेमचंदांच्या निवडक कथा; हिंमत पाटील व सौ. सुधा देशपांडे १·७५
म्हणी : अनुभवाच्या खाणी : म्हणींच्या पार्श्वकथा; य. न. केळकर; नी. शं. नवरे २·००
दोन शिलेदार : दोन मुलांचा पराक्रम ऐतिहासिक कादंबरी; सुधाकर प्रभु १·५०
आषाढी कार्तिकी : (दु. आ.) महाराष्ट्र-संत-दर्शनें; भा. द. खेर १·५०
इतिहासाच्या पानोपानीं : १ : कथासंग्रह संपादक—अमरेन्द्र गाडगीळ १·५०
लंबदूम : मुलांसाठीं एक बहारदार गोष्ट ;अनु. आशा भालेकर १·२५
माध्यमिक शाळांतील सांस्कृतिक : शाळांतील सांस्कृतिकच्या तासांसाठीं मार्गदर्शन : वि. उ. वैद्य २·००
अदृश्य माणूस : 'Invisible Man' रूपांतर; मा. कृ. वेहेरे १·५०
मंगलवाडी : छात्रालयीन शाळेतील एका विद्यार्थ्याचें आत्मकथन : 'बलवन्त' १·५०
आव्हान : परग्रहावरील वैज्ञानिकांसंबंधींची विज्ञानकाल्पनिका; अनु. दि. बा. मोकाशी ०·९०
क्रांतिकारक खटले : गाजलेले राजकीय खटले; भा. द. खेर २·००
शब्दसृष्टीचे ईश्वर : संतकवींचीं हृदयंगम दर्शनें; बालशंकर देशपांडे २·००

......अशीं आणखी कितीतरी पुस्तकें. यादी मागवा.

# कांहीं तरी नवेंच करा

जीवनाची ठराविक चाकोरी सोडून—'कांहीं तरी नवेंच' करण्याची ईर्षा बाळगली आणि तत्सिद्ध्यर्थ विशिष्ट जीवनक्षेत्रांत अलौकिक कर्तृत्व केलें अशांची चरित्रें.

तीस मिनिटांत वाचून होणारीं पुस्तकें : शालेय-वर्गग्रंथालयासाठीं योजना

१. असा असतो देशभक्त : कोतवाल
२. गुलाम बंड करतो : स्पार्टकस
३. रा. शिक्षणाचा ध्यास : विजापूरकर
४. कादंबरीकार हरीभाऊ : आपटे
५. मराठी नटसम्राट : गणं. जोशी
६. व्यायाम भीष्माचार्य : माणिकराव
७. लष्करी संघटक : क. लॅरेन्स
८. अलौकिक शिल्पकार : एंजलो
९. चित्रपट महर्षि : दादासाहेब फाळके
१०. इतिहासाचार्य राजवाडे : राजवाडे
११. बंदीजनांची माउली : फ्राय
१२. देशासाठीं दर्यापार : जेम्स कुक
१३. वीरबाला झोया : ( रशिया )
१४. बहादूर शिकारी : जिम कॉर्बेट
१५. कोई बी चीज उठाव : वुलवर्थ
१६. वीरपत्नी राणी दुर्गावती :
१७. विख्यात वकील : बॅ. जयकर
१८. विलक्षण वार्ताहर : अर्नेस्ट पाइल
१९. भारतीय चित्रकार : रविवर्मा
२०. मराठी मुद्रण-प्राणदाता : जावजी
२१. राजमाता जीजाबाई
२२. स्वदेशी कारखानदार : अंताजी काळे
२३. भव्य स्थापत्य : फर्डिनांड द लेसेप्स
२४. सर्कस बहाद्दर : विष्णुपंत छत्रे
२५. भक्तिवेडी बहिणा : बहिणाबाई
२६. सद्गुणी बनण्याची कला : फ्रॅंकलिन
२७. भारत-कवि टागोर : रवींद्रनाथ
२८. कोशकार केतकर : डॉ. केतकर
२९. कृषिपंडित : दादासाहेब शेंबेकर
३०. खरा खेळाडू : पी. बाळू
३१. चिरंजीव मरण : मदनलाल धिंग्रा
३२. विद्यामहर्षि : अण्णासाहेब चिरमुले
३३. तेजस्वी धर्मोद्धारक : शंकराचार्य
३४. बंडखोर लोककवि : अनंत फंदी
३५. साकार संगीत : पं. पलुस्करबुवा
३६. साहसी वैमानिक : सॅंटा ड्युमो
३७. दरियाचा राजा : कान्होजी आंग्रे
३८. जमिनीचा जादूगार : डॉ. कार्व्हर
३९. लाखांचा प्राणदाता : लुई पाश्चर
४० शिक्षण-भगीरथ : भाऊराव पाटील
४१. मराठी-मुद्रक : गणपत कृष्णाजी
४२. बर्फांतला माणूस : हिलरी
४३. प्राणाघरचा प्रवास : शिफले
४४. दानशूर कुबेर : रॉकफेलर
४५. प्रवासी पंडित : ह्युएनत्संग
४६. नृपनिर्माता : आर्य चाणक्य
४७. असामान्य क्रिकेटपटु : ब्रॅडमन
४८. लोकहिताचा संरक्षक : वि. पटेल
४९. पहिला मिशनरी : गजाननराव वैद्य
५०. तुम्हांला कोण व्हावेंसें वाटतें ?

प्रत्येक पुस्तक पन्नास नये पैसे : संच पेटी रु. २५.

**वोरा अॅण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.**